# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 12 January 2025

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १२ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

राज्य परिवहन महामंडळ-एस.टी.च्या ताफ्यात या वर्षी अडीच हजारांहून जास्त स्वमालकीच्या नव्या बसगाड्या दाखल होत असून याद्वारे राज्याच्या प्रत्येक रस्त्यावर नवी लालपरी धावताना दिसेल, असं प्रतिपादन राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलं आहे. ते आज ठाणे इथं राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.याप्रसंगी १७ नव्या गाड्यांचं लोकार्पणही झालं. स्वच्छतेसह सुरक्षित प्रवासाला महत्त्व देत एकूणच परिवहन सेवेचं चित्र बदलण्याचा आराखडा बनवला जात असून टप्प्याटप्प्यानं एसटीच्या आधुनिकीकरणाला सुरुवात होईल असं सरनाईक म्हणाले. याचा पहिला लाभ एसटी कर्मचाऱ्यांना, त्यांच्या गणवेशापासून - विश्रामगृह आणि स्वच्छतागृहापर्यंत मिळणाऱ्या प्रत्येक सुविधांचा दर्जा उंचावून होईल असं सांगून त्याद्वारे एसटी कर्मचारी प्रवाशांना चांगल्या सुविधा देऊ शकतील असं ते म्हणाले.

****

स्वामी विवेकानंद यांची आज १६३वी जयंती. अध्यात्मिक गुरु, तत्वज्ञ-विचारवंत आणि भारतीय संस्कृतीचे प्रणेते असलेल्या विवेकानंदांची जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून देशभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरी केली जात आहे.स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त, दिल्लीच्या भारत मंडपम् इथं आयोजित विकसित भारत युवा नेते संवाद कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी आज तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यानिमित्त समाजमाध्यमावरील आपल्या संदेशात स्वामी विवेकानंदांनी भारताचा महान आध्यात्मिक संदेश पाश्चिमात्यांपर्यंत प्रसारीत केला ,भारतीयांमध्ये आत्मविश्वास जागृत करत युवकांना राष्ट्रनिर्माणासाठी प्रोत्साहीत केले आणि या विचारांचा वारसा सदैव टीकणारा असल्याचं नमूद केलं आहे. तसंच उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान यांनीही स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आपल्या संदेशांमधून अभिवादन केलं आहे.

****

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महारारजांच्या मातोश्री–राष्ट्रमाता जिजाऊ यांची आज ४७२वी जयंती, राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्त, छत्रपती संभाजीनगर इथं आज वाहन फेरी काढण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात, मुला–मुलींच्या जन्मत: लिंग गुणोत्तर प्रमाणाबाबत प्राप्त आकडेवारीनुसार एक हजार मुलांमागे ८८९ मुली असं प्रमाण आढळलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अभय धानोरकर यांनी ही माहिती दिली. आकडेवरीनुसार छत्रपती सांभाजीनगर, फुलंब्री आणि सोयगाव तालुके वगळता अन्य तालुक्यांमध्ये मुलिंचं जन्मतः प्रमाण ९०० पेक्षा कमी आहे.

****

भारतीय जनता पक्षाच्या महा विजयी अधिवेशन आज शिर्डी इथं होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दीपप्रज्वलानं या अधिवेशनास प्रारंभ झाला. तत्पूर्वी फडणवीस, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. महापुरुषांच्या प्रतिमा तसंच संविधानाचं पूजन यावेळी करण्यात आलं.

****

भारत–आयर्लंड महिला संघांदरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत,आज दुसरा सामना गुजरातच्या राजकोट इथं सुरु आहे. नाणेफेक जिंकून भारतानं प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. ताज्या वृत्तानुसार भारतानं २२ षटकांत दोन बाद १६३ धावा केल्या आहेत.

****

पुरुष हॉकी इंडिया लीग स्पर्धेमध्ये यूपी रुद्राज संघानं काल रात्री राउरकेला इथं झालेल्या सामन्यात दिल्ली एसजी पाइपर्स संघावर ३–१ असा विजय नोंदवला. अन्य एका सामन्यात हैदराबाद तुफान्स संघानं काल पेनल्टी शूट आउट सडन डेथमध्ये सूरमा हॉकी क्लबवर मात केली. आज राउरकेला इथं वेदांत कलिंगा लांसर्सचा सामना हैदराबाद तुफान्स बरोबर होईल. हा सामना संध्याकाळी सहा वाजता सुरू होणार आहे. कलिंगा लांसर्स पाच सामन्यांत सात गुण घेऊन पाचव्या स्थानावर आहे. हैदराबाद तुफान्स सात अंक घेऊन सहाव्या स्थानावर आहे. महिला हॉकी इंडिया लीगमध्ये दिल्ली एसजी पाइपर्स आज ओडीशा वारियर्स बरोबर मालिकेतला पहिला सामना खेळणार आहे. रांचीमध्ये रात्री आठ वाजून ४० मिनिटांनी हा सामना सुरू

होईल. पहिल्या महिला हॉकी इंडिया लीग स्पर्धेमध्ये चार संघ सहभागी होत आहेत. ही स्पर्धा २४ जानेवारी पर्यंत चालेल.

****

नांदेड इथं आयोजित ५९व्याs तीन दिवसीय अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनात आजच्या दुस–या दिवशी भारतीय अंतराळ संशोधन संस्था– इस्रोच्या तनुजा पत्की यांचं 'विज्ञान , तंत्रज्ञान आणि आजचा भारत' या विषयावर व्याख्यान तसंच तज्ज्ञ मान्यवरांचा सहभाग असलेल्या परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेवर आधारित खासदार क्रिडा महोत्सवाचा सातव्या पर्वाचं आज नागपूर इथं यशवंत क्रीडा संकुलामध्ये थाटात उद्घाटन करण्यात आलं. यावेळी गडकरी, खासदार कंगना राणावत उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे क्रीडा संस्कृती रुजवण्यासाठी प्रयत्न होत आहे.

****